SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/२०२२-२३/10 दिनांक : 21/03/2023

# परिपत्रक

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,**
(Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांसाठी )

**विषय : माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS)**
वेबपोर्टलवर सन २०२२-२३ या वर्षाची माहिती नोंदणेबाबत....

**संदर्भ : मा.डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट राज्य, पुणे यांचे क्र .उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२२-२३/३५२७ दिनांक १७/०३/२०२३ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षण संचालनालयाकडून सन २०२२-२३ हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित तसेच Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२२-२३ करिता दिनांक ३० सष्टेंबर, २०२२ हया संदर्भ दिवसा पर्यंतची माहिती एमआयएस वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे.

सदरची माहिती दिनांक १०/०४/२०२३ पर्यंत माहिती नोंदणीचे काम संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निशिचतपणे पुर्ण करावयाचे आहे. आपल्या महाविद्यालयांचे एमआयएस नोडल अधिकारी आपल्या महाविद्यालयांची माहिती वेबपोर्टलवर नोंद करतात. सदरची माहिती वेबपोर्टलव्दारे संकलित करून मा. मंत्री महोदय व शासनाला धोरणात्मक निर्णय घेताना उपयोगी पडत असल्यामुळे आपण वेबपोर्टलवर नोंद करत असलेली माहिती बिनचुक नोंद करावयाची आहे. माहिती नोंद केल्यानंतर पत्रा सोबत जोडलेले प्रमाणपत्रावर प्राचार्याची स्वाक्षरी घेवून ते प्रमाणपत्र महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्षाकडे सादर करावयाचे आहे. तसेच एक प्रत सॉफ्ट कॉपीव्दारे मा. शिक्षण संचालनालय, पुणे कार्यालयाच्या stat.dhepune@nic.in या ई-मेल आयडी वरती पाठविण्यात यावी.

महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सदर बाब आपल्या महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडून त्वरीत कार्यवाही करून घ्यावी. ही विनंती.

**एमआयएस वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, (खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**प्र-कुलसचिव**

(महाविद्यालयाने द्यावयाचे प्रमाणपत्र)

# -: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस.) सन २०२२-२३ या वेबपोर्टलवर ..........................................................................................

..............................................................................................................................

हया महाविद्यालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

दिनांक : / /२०२३ स्वाक्षरी :

ठिकाण : प्राचार्याचे नाव :

महाविद्यालयाचे नाव व शिक्का :